# // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना कळविण्यांत येते की, Animal Welfare Board of India (Animal Birth Control, Rules 2023) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट श्वानांवर व मांजरावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरणाचा ठेका मे. प्रतापराव राणे एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना देण्यात आलेला असून सदर प्रकल्प उत्तन शिरे गावठण, मराठी शाळेजवळ, उत्तन येथे कार्यान्वीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट श्वानांवर व मांजरावर 100 % निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण प्रस्तावित असून आपल्या कार्यक्षेत्रातील निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण न झालेल्या श्वानांची व मांजरांची माहिती **मे. प्रतापराव राणे एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना दुरध्वनी क्र. 8657021920** वर **सकाळी** 10.00 **ते संध्या.** 5.00 **या वेळेत** देण्यात यावी. यापुर्वी मोकाट श्वानांवर व मांजरावर निर्बिजकरण व शस्त्रक्रिया केलेल्या श्वानांच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह करण्यात आलेले आहे. ज्या श्वानांच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह नसेल अशा श्वानांची माहिती वरील भ्रमणध्वनी क्रमांकावर देण्यात यावी जेणेकरून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील श्वानांवर / मांजरांवर 100 % निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण शक्य होईल.

सदरचे काम AWBI Rules 2023 नुसार करण्यात येत असुन प्राणी प्रेमी संघटना व इतर व्यक्ती यांचेकडुन मोकाट श्वान/ मांजर पकडणे किंवा सोडण्याचा ठिकाणी तसेच ह्या संबधित कामाबाबत अडथळा करण्यात येउ नये अन्यथा संबधितावर कायदेशीर कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (पशुसंवर्धन),**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

C:\Users\Dell\Desktop\प्रेस नोट 2025 अपडेट फोन नंबर.docx